# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा शैक्षणिक दृष्टीकोन

**गणेश रेवणसिद्ध वाघमारे** संशोधक विद्यार्थी, इतिहास विभाग, शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज ता. माळशिरस जि. सोलापूर. Email: ganeshwaghmare001@gmail.com, Ph.: 9423793363

**प्रा.डॉ. दत्तात्रय गोरख मगर** सहा. प्राध्यापक, इतिहास विभाग, शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज ता. माळशिरस जि. सोलापूर Ph.: 7721088352

---

## प्रास्ताविक

मानवी जीवनविकासात शिक्षणाला महत्त्वपूर्ण स्थान आहे. शिक्षण मानवाच्या मानसिक व बौद्धिक शक्तींचा विकास करते. शिक्षणाशिवाय माणूस पशूसमान होतो. शिक्षण हे मानवी विकासाचे प्रभावी माध्यम आहे. या माध्यमातून समाजाला सुशिक्षित करून समाजाची पर्यायाने राष्ट्राची प्रगती साधता येते. स्वातंत्र्य, समता, न्याय यासारखी सामाजिक मूल्ये आणि आपले हक्क व कर्तव्ये यांची जाणीव शिक्षणामुळे होऊन शोषणमुक्त समाजाची निर्मिती करता येते.

आपल्या अलौकिक कार्याने व नि:स्वार्थी वृत्तीने ज्यांनी सामाजिक सुधारणांसाठी आपले आयुष्य वेचले असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आयुष्यभर खडतर ज्ञानसाधना करून विधिशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र या विषयांमध्ये प्रभुत्व संपादन केले. उच्चविद्याविभूषित झाल्यानंतर आपल्या शिक्षणाचा केवळ स्वत:च्या स्वार्थासाठी विचार न करता दलित, शोषित आणि पीडित समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी त्यांनी आपले आयुष्य समर्पित केले. ते थोर विचारवंत, घटनाकार, पत्रकार, शिक्षणतज्ञ, अर्थशास्त्रज्ञ व समाजशास्त्रज्ञही होते. त्यांनी शिक्षणाला समाजाच्या प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाचे मानले तसेच 'लोकशिक्षक' या नात्याने शैक्षणिक कार्य करून आपले शिक्षण विषयक विचार मांडले.

## शिक्षणाचे महत्त्व

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाला समाजाच्या प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाचे मानले. त्यांच्या मते, शिक्षण हे समाजातील प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जगण्यासाठी आणि आपले हक्क मिळवण्यासाठी आवश्यक आहे. त्यांनी शिक्षणाला एक शस्त्र मानले, ज्याच्या सहाय्याने समाजातील दुर्लक्षित, दलित आणि अशिक्षित वर्गाला सन्मानाचा दर्जा प्राप्त होऊ शकतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित समाजाला सतत शिकण्याची हाकाटी दिली. कारण शिक्षणामुळेच आपल्या जगण्यात आमूलाग्र बदल होऊ शकतो, हे त्यांनी जाणलं होतं. बाबासाहेबांचा शिक्षणविषयक दृष्टिकोन प्रगल्भ आणि आधुनिक होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणवंचित दलित समाजाच्या शिक्षणासाठी पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना करून दलित समाजाला जे शिक्षणाचे दान दिले ते जेवढे क्रांतिकारी आहे, तेवढेच मागासवर्गीयांच्या शिक्षणासंदर्भात बाबासाहेबांनी जे चिंतन केले तेही तितकेच मूलगामी स्वरूपाचे आहे. ज्ञानाअभावी व्यक्ती आणि समाजाचे नुकसान जसे होते, तसेच एखादी व्यक्ती वा समूहाला शिक्षण नाकारणे म्हणजे माणूस म्हणून त्याचे अस्तित्व नाकारून त्याच्या क्षमता मारून टाकणे होय; अशी बाबासाहेबांची शिक्षणविषयक धारणा होती.

'व्यक्तीला जाणीव करून देते ते शिक्षण' अशी शिक्षणाची व्याख्या करणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाच्या बळावर संपूर्ण विश्वात ओळख निर्माण केली. भारतीय समाजव्यवस्थेत अस्पृश्य समजल्या गेलेल्या समाजाला सन्मानाचा दर्जा प्राप्त करून दिला. शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही ही त्यांची कायम भूमिका राहिली.अशिक्षित, दुर्लक्षित, दलित अस्पृश्य समाजाला शिक्षणाचे महत्त्व पटवून सांगितले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समग्र व व्यापक पद्धतीने विचार केला होता. बहिष्कृतांच्या समस्येवरील उपाय, शिक्षण ऐहिक हिताचे, लोकशाहीकरण, नैतिकीकरण, राजकीय सामाजिकीकरण, राजकीय जाणिवांचा विकास, राजकीय संघटन, राजकीय कृतीप्रवणता, राजकीय संघर्ष असे विविध शैक्षणाचे उद्देश त्यांनी त्यांच्या भाषणात आणि लेखनात व्यक्त केले. त्यांनी शिक्षणाची निवड सामाजिक लोकशाहीच्या प्राप्तीसाठी देखील केली होती. त्यांनी शिक्षणाचा हेतू लोकांचे नैतिकीकरण व सामाजिकीकरण करणे हा आहे, यावर भर दिला होता.[1]

## प्राथमिक शिक्षण

केवळ बाराखड्या शिकविणे म्हणजे शिक्षण नव्हे, तर मुलांची माने सुसंस्कृत करणारे दर्जेदार शिक्षण शाळांनी दिले पाहिजे. इतका सुक्ष्म विचार बाबासाहेबांनी प्राथमिक शिक्षणाबाबत केला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते प्राथमिक शिक्षणाचा प्रसार हा राष्ट्रीयदृष्ट्या अत्यंत महत्वाचा प्रश्न होता. प्राथमिक शिक्षणाचा प्रसार सर्वांगीण राष्ट्रीय

इमारतीच्या प्रगतीचा पाया आहे आणि केवळ लोकांच्या खुशीवर हा प्रश्न सोपविल्यास प्राथमिक शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार होण्यास कित्येक शतके लागतील असे त्यांचे मत होते.

12 मार्च १९२७च्या मुंबई विधान मंडळातील प्राथमिक शिक्षणावरील अनुदान विधेयकावर चर्चा करताना डॉ. आंबेडकर म्हणतात, 'प्राथमिक शिक्षणाचा उद्देश्य आहे की, एकदा मुलाने प्राथमिक शाळेत प्रवेश घेतला की, तो साक्षर होत नाही आणि उर्वरित आयुष्यात साक्षर राहण्याची क्षमता विकसित करत नाही तोपर्यंत त्याने प्राथमिक शाळा सोडू नये'. याच चर्चेदरम्यान ते पुढे म्हणतात, 'हिंदुस्थानात शैक्षणिक उन्नतीसाठी केले जाणारे सर्व प्रयत्न व्यर्थ जातात. बहुतांश शिक्षणतज्ञांचे असे मत आहे की, प्राथमिक शिक्षण सक्तीचे केल्याशिवाय हा अपव्यय थांबविता येणारच नाही'.[2] म्हणूनच राज्यघटना निर्मितीवेळी डॉ. आंबेडकरांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत मिळावे यासाठी भारतीय राज्यघटनेत कायदारूपी तरतूद केली. त्यांनी मुले आणि मुली यांना प्राथमिक शिक्षणाची कायद्याने सक्ती केली. शिक्षण हे प्रत्येक व्यक्तीचा मूलभूत अधिकार आहे आणि त्यासाठी कोणत्याही प्रकारचा भेदभाव असू नये, असे त्यांचे प्रामाणिक मत होते.

**उच्च शिक्षण**

डॉ. आंबेडकरांनी उच्च शिक्षणाच्या प्रसारासाठी आयुष्यभर धडपड केली. उच्च शिक्षण घेतल्याने व्यक्तीला समाजात सन्मानाने जगता येते आणि आपले हक्क मिळवता येतात हे त्यांनी जाणले होते. त्यामुळेच डॉ. आंबेडकरांना मुंबई विद्यापीठ ही प्रशासकाचे नव्हे तर, विद्याव्यासंगी माणसांचे महामंडळ व्हावे असे वाटत होते. तेथे ज्ञान संपादन व ज्ञानप्रसार ही अग्रगण्य कार्य घडून यावे ही धारणा होती. 05 ऑक्टोबर 1927 च्या मुंबई विधान मंडळातील मुंबई विद्यापीठ कायदा दुरुस्ती विधेयकावर चर्चा करताना डॉ. आंबेडकर म्हणतात, 'विद्यापीठाच्या अनेक महत्त्वपूर्ण आणि मूलभूत कार्यांपैकी एक म्हणजे गरजू आणि गरीबांच्या दारापर्यंत उच्च शिक्षणाच्या सोयी पोहचविणे हे आहे.'[3]

डॉ. आंबेडकरांना शिक्षणाच्या बाबतीत समता हवी होती. त्या हेतूनेच विद्यापीठीय शिक्षणावर लक्ष केंद्रित करून आपले क्रांतिकारी विचार मांडले आहेत. 'आमच्यासाठी शिक्षण हा सर्वात महत्त्वाचा भौतिक लाभ आहे. त्याकरिता आम्ही तीव्र संघर्षासाठी तयार आहोत. त्यासाठी आम्ही कोणत्याही भौतिक लाभाचा त्याग करू शकतो. या संस्कृतीने उपलब्ध करून दिलेल्या प्रत्येक लाभाचा त्याग करण्याची आमची तयारी आहे. पण कोणत्याही परिस्थितीत उच्च शिक्षणाचा अधिकार आणि संधी यांच्या महत्तम उपयोगाच्या हक्काचा आम्ही त्याग करावयास तयार नाही.' [4]

मिलिंद महाविद्यालयाच्या शिलान्यास प्रकरणी बोलताना बाबासाहेब म्हणतात, 'हिंदू समाजाच्या अगदी खालच्या थरातून आल्यामुळे शिक्षणाचे महत्त्व किती आहे हे मी जाणतो. खालच्या समाजाची उन्नती करण्याचा प्रश्न आर्थिक असल्याचे मानण्यात येते. पण हे चूक आहे. कारण हिंदुस्तानातील दलित समाजाची उन्नती करणे म्हणजे त्यांच्या अन्न, वस्त्र, निवाऱ्याची सोय करून पूर्वीप्रमाणे त्यांना उच्चवर्गाची सेवा करण्यास भाग पाडणे नव्हे. खालच्या वर्गाची प्रगती मारून त्यांना दुसऱ्याचे गुलाम व्हावे लागत असल्यामुळे त्यांच्यात निर्माण होणारा न्यूनगंड नाहीसा करणे, हे खरे शिक्षणाचे ध्येय आहे. आमच्या सर्व सामाजिक दुखण्यावर उच्चशिक्षण हेच एकमेव औषध आहे.' तात्पर्य बाबासाहेबांना उच्चशिक्षणाद्वारे समता, स्वातंत्र्य, बंधुभाव ही मानवी मूल्ये स्वीकारलेला एक स्वाभिमानी आधुनिक समाज निर्माण करायचा होता.

**स्त्री शिक्षण**

स्त्रियांच्या प्रगतीवर समाजाची प्रगती अवलंबून आहे, असे डॉ. आंबेडकर म्हणत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्रीमुक्ती विषयक कार्य उपेक्षित, वंचित घटकातील स्त्रियांपुरतेच मर्यादित नव्हते, तर देशातील सर्व स्त्री वर्गाच्या उद्धाराचे कार्य त्यांनी हाती घेतले होते. जाती, वर्गविरहित स्त्रीवर्गाचा सर्वांगीण विकास व्हावा, यासाठी त्यांनी वेळोवेळी आपल्या लिखाणातून, भाषणातून व चळवळीतून विचार मांडले आहेत. एकूणच भारतीय समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आपले संपूर्ण आयुष्य खर्ची घालणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या आयुष्यात विद्यार्थीदशेपासूनच स्त्री-स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते होते. कोलंबिया विद्यापीठात शिक्षण घेत असताना आपल्या वडिलांचे स्नेही सुभेदार शिवनाक जमेदार यांना न्यूयॉर्कवरून दि. 4 ऑगस्ट, 1913 रोजी पाठवलेल्या पत्रातून स्त्री-स्वातंत्र्य व स्त्री शिक्षणाबद्दल उदात्त दृष्टिकोन स्पष्ट होतो. त्यात त्यांनी भारतातील पददलित व स्त्रिया यांच्या दैन्यावरचा रामबाण उपाय म्हणजे शिक्षणच होय अशी त्यांची खात्री होती. [5]

27 डिसेंबर 1927 महाड येथील सत्याग्रह परिषदेमध्ये महिलांना दिलेल्या भाषणामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, "तुम्ही आपल्या मुलींनाही शिक्षण दिले पाहिजे. ज्ञान आणि विद्या या गोष्टी काही पुरुषांसाठीच नाहीत, त्या स्त्रियांनाही आवश्यक आहेत. आपली पुढील पिढी जर तुम्हास सुधारवयाची असेल तर मुलींना शिक्षण दिल्याशिवाय राहू नका."[6]

20 जुलै 1942 रोजी नागपूर येथील आयोजित डिप्रेस्ड क्लासेस वुमेन्स कॉन्फरन्स मध्ये महिलांना उद्देशून केलेल्या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, "स्त्रियांची प्रगती ज्या प्रमाणात झाली असेल त्यावरून एखाद्या समाजाची प्रगती मी मोजीत असतो म्हणूनच हा समुदाय पाहिल्यावर मला खात्री वाटते व आनंद होतो की आम्ही प्रगती केली आहे." डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा शिक्षण विषयक दृष्टीकोन प्रगल्भ होता. घरातील स्त्री शिकली तर संपूर्ण कुटुंब हे सुशिक्षित होते. हा त्या वेळचा दृष्टीकोण आजही लागू पडतो. स्त्री पुरुष समानता हा गुण डॉ. बाबासाहेबांच्या शैक्षणिक विचारातून प्रकर्षाने जाणवतो. शिवाय शिक्षणातील विषमता या विचारातून कमी होऊ शकते.

**शिक्षण आणि समाजसुधारणा**

डॉ. आंबेडकरांनी शिक्षणाच्या बळावर समाजातील दुर्लक्षित वर्गाला सन्मानाचा दर्जा प्राप्त करून दिला. त्यांनी शिक्षणाला एक शस्त्र मानले, ज्याच्या सहाय्याने समाजातील दुर्लक्षित, दलित आणि अशिक्षित वर्गाला सन्मानाचा दर्जा प्राप्त होऊ शकतो. त्यांच्या मते, शिक्षण हे दुधारी शस्त्र आहे, ज्याचा सदुपयोग की दुरुपयोग करावयाचा हे त्या माणसाच्या शिलावर अवलंबून आहे. शिक्षणाबरोबरच माणसाचे शीलही सुधारले पाहिजे. त्याशिवाय शिक्षणाची किंमत शून्य आहे, म्हणून त्यांचा आग्रह होता की, ज्ञानाला चारित्र्याची जोड मिळाली पाहिजे. [7] 'चारित्र्य' ही मानवाची शक्ती आहे असा त्यांचा ठाम विश्वास होता.

डॉ. आंबेडकरांनी आपल्या शिक्षण संस्थेचे धोरण जाहीर करताना स्पष्ट केले की, 'पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे धोरण हे केवळ शिक्षणप्रसार करण्याचे नसून भारतात बौद्धिक, नैतिक आणि सामाजिक लोकशाहीचा ज्याद्वारे विकास होईल अशी मनोवृत्ती घडवून आणण्याचे कार्य तिला शिक्षण प्रसाराच्या माध्यमातून करावयाचे आहे.' [8] डॉ. आंबेडकरांना असे अपेक्षित होते की, सुशिक्षित वर्गाने आपली जबाबदारी ओळखून उपेक्षित वर्गाला शिक्षण देणे गरजेचे आहे. या संदर्भात ते म्हणतात, 'शिक्षणाचे नियंत्रण सुशिक्षित वर्गाने केले पाहिजे. परंतु त्यांच्याकडे सामाजिक सद्-गुणांचा अभाव आहे. हा वर्ग जनतेला सक्रिय शिक्षण देण्यास विरोध करतो. विद्यापीठाने उपेक्षित वर्गाच्या घराघरात शिक्षणाची गंगा घेऊन जावी. विद्यापीठाचे मूल्यांकन केवळ त्यांचा ज्ञान संपादनाने न होता, त्यांच्या सामाजिक बांधिलकिने झाले पाहिजे.' [9]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय समाजव्यवस्थेत निसर्गवादाचे शैक्षणिक तत्व मोठ्या प्रयासाने रूजविले. शिक्षण हा सर्वांचा अधिकार आहे. शिक्षणावर व्यक्तीची योग्यता ठरते, जातीवर नाही हा विचार त्यांनी भारतीय समाजव्यवस्थेत रूजविला. विशिष्ट एका जातीचा म्हणून त्याला शिक्षणापासून दूर ठेवणे म्हणजे निसर्गनियमांचा भंग करणे होय, हा विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सर्वप्रथम भारतात मांडला. डॉ. आंबेडकरांच्या प्रयत्नातून, परिश्रमातून व संघर्षातून भारतीय समाजव्यवस्थेत निसर्गवादाचा सिद्धांत रूजला. शिक्षण घेण्यासाठी जात, धर्म, वय, लिंग हे भेद पुसले गेले. निसर्गवाद शिक्षणाचे ध्येय हे लोकनिष्ठ मानतो. डॉ.बाबासाहेब आंबेडकर या ध्येयाला अनुसरून विचार मांडताना म्हणतात. आपला व्यक्तीविषयक लौकीक वाढविणे व त्याबरोबरच आपल्या समाजाची योग्यता वाढविणे हे केवळ शिक्षणावर अवलंबून आहे. आध्यात्मवाद किंवा आदर्शवादाप्रमाणे शिक्षणाची उद्दिष्ट्ये परलोक प्राप्ती नसून स्वविकास आणि सामाजिक उन्नती असे असायला हवे. तरच शिक्षण खऱ्या अर्थात मानवोपयोगी ठरेल अशी सैद्धंतिक दृष्टिकोण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडला.

**समारोप**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना स्वाभिमान, स्वावलंबन व आत्मोद्धार हे परिणामकारक शिक्षणाचे ध्येय होय हे त्यांचे मत शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करते. स्वत:च्या व्यक्तिमत्त्वाचा प्रत्यय, आत्मविश्वास, आत्मआदर आणि आपल्या व्यक्तिमत्त्वाची प्रतिष्ठा शिक्षणात आहे हे त्यांनी जाणले होते. 13 जून 1953 रोजी रावळी कॅम्प, मुंबई येथील भाषणात ते म्हणाले होते, ' आपण शिकलो म्हणजे सर्व काही झाले असे नाही. शिक्षणाबरोबर माणसाचे शीलही सुधाले पाहिजे. शीलशिवाय शिक्षणाची किंमत शून्य आहे'. [10] डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना शिक्षण ही शोषणमुक्तीची पायवाट वाटत होती. 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' या तीन तत्त्वात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शिक्षणिक विचारांचे सार आहे. शिकून क्रियाशील बनणे, अन्याय-अत्याचाराच्या विरुद्ध संघर्ष करणे आणि त्या ध्येयासाठी संघटन उभारणे म्हणजे क्रांतीचा मार्ग खुला करणे असे त्यांचे मत होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना नवमानवतावादाचे संस्कार करणारे शिक्षण हवे होते. शिक्षण हा विकासाचा, आत्मोद्धारचा मार्ग त्यांना वाटत होता. आत्मोद्धारासाठी त्यांनी स्वातंत्र्याचा आग्रह धरला, स्वावलंबनासाठी त्यांना समता हवी होती आणि स्वाभिमान प्रदान करणारी बंधुता त्यांना अभिप्रेत होती. हे सर्व शिक्षणातून निर्माण होईल असा त्यांचा विश्वास होता. त्यासाठी त्यांना सर्वांसाठी शिक्षण खुले हवे होते. शिक्षण हाच राष्ट्रीय उन्नतीचा व सामाजिक क्रांतीचा

मुलमंत्र वाटत होता. शिक्षण म्हणजे परिवर्तन आणि सामाजिक क्रांतीचे प्रभावी साधन साधन आहे हेच त्यांच्या शैक्षणिक विचारांचे मुख्य सूत्र होते.

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार विश्लेषण करतांना एकच मुद्दा प्रकर्षाने जाणवतो तो म्हणजे मानवी जीवनाला यशस्वी आणि प्रतिष्ठापूर्ण जगण्यासाठी शिक्षण हा अविभाज्य घटक असल्याचा दृष्टिकोन स्पष्ट होतो. शिक्षणाचा मूलभूत विचार देणारे डॉ. बाबसाहेब आंबेडकर यांचा हेतू फक्त शिक्षण देण्याचाच नव्हता, तर भारतामध्ये बौद्धिक, सामाजिक आणि नैतिक लोकशाहीचे प्रचलन करण्याचा होता. शिक्षण ही व्यक्ती विकासाची गुरुकिल्ली आहे, समाजपरिवर्तनाची गुरुकिल्ली आहे, समाजक्रांतीची गुरुकिल्ली आहे. समाज परिवर्तनाच्या क्रांतीमध्ये उच्चशिक्षित होऊन आपले योगदान द्यावे आणि देशाला प्रगतीच्या दिशेने एक पाऊल पुढे घेऊन जावे हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा शिक्षणविषयक दृष्टिकोन आजही तितकाच महत्त्वाचा आहे

**संदर्भ**


1. प्रा.पवार, प्रकाश, महाराष्ट्राचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, म. रा. सा. सं. मंडळ, मुंबई, (प्र. आ.)2023, पृ. 28 व 29.
2. गायकवाड, प्रदीप(संपा.), डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची समग्र भाषणे, खंड 1, क्षितीज पब्लिकेशन, नागपूर(द्वि. आ.)2001, पृ. 32.
3. उपरोक्त, पृ. 66.
4. उपरोक्त, पृ. 67 व 68.
5. पवार, दया (संपा.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथ, म.रा.साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, (पु. मु.) 1999, पृ. 331.
6. गायकवाड, प्रदीप(संपा.), डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची समग्र भाषणे, खंड 1, क्षितीज पब्लिकेशन, नागपूर(द्वि. आ.)2001, पृ. 85 .
7. पवार, दया (संपा.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथ, म.रा.साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, (पु. मु.) 1999, पृ. 328.
8. डॉ. आंबेडकर, बाबासाहेब, नाग-नालंदा प्रकाशन, इस्लामपूर, (पु. मु.) 2011, पृ. 89
9. पवार, दया (संपा.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथ, म.रा.साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, (पु. मु.) 1999, पृ. 328.
10. उपरोक्त, पृ. 334.